माहितीस्तव

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर ४१६ ००४

PBX – (०२३१) २६९६१०१, २६९६१०२, २६९६१०३ E-Mail :divsec.kop@ gmail.com

क्र.कोविमं/माध्य.गोप./परीक्षा / 2629
दिनांक :- ०८/०२/२०२२

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा व शासकिय तंत्र विदयालय,
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय : माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च/एप्रिल २०२२ तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण तक्ते भरण्याबाबतच्या व साहित्य वितरणाबाबतच्या सूचना**

**संदर्भ :-** १. वाचा - राज्य मंडळाचे पत्र क्र. रा.म./ परीक्षा-६ / ७०७२ दिनांक २०/१२/२०२१
२. वाचा - मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेले या कार्यालयाचे पत्र क्र. को.वि.मं./ ए-१ गोपनीय/प्रा.प./२५९९ दि.०५/०२/२०२२

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रातील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा प्रमुखांना कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (१०वी) मार्च / एप्रिल २०२२ च्या परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भाषा विषयांची तोंडी परीक्षा तसेच विज्ञान व गणित, तंत्र व पूर्व व्यावसायिक, शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र या विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा शुक्रवार दिनांक २५/०२/२०२२ ते सोमवार दिनांक १४/०३/२०२२ रोजी आयोजित करण्याबाबत संदर्भीय परीपत्रक कोल्हापूर विभागीय मंडळाच्या www.sscboardkolhapur.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे. या विभागीय मंडळामार्फत तोंडी/प्रात्यक्षिक/अंतर्गत मुल्यमापन परीक्षेचे साहित्य दिनांक १८/०२/२०२२ रोजी संबंधित वितरण केंद्रावर सकाळी १०.०० ते ५.०० या वेळेत वाटप करण्यात येणार आहे याची शाळाप्रमुखांनी नोंद घ्यावी.

**अ.** संदर्भ क्रमांक २ नुसार दिलेल्या सूचनेप्रमाणे प्रात्यक्षिक, श्रेणी व तोंडी, प्रकल्प व अंतर्गत मुल्यमापन कोविड १९ विषाणूच्या प्रादूर्भावाच्या पार्श्वभूमीवर दिलेल्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे परीक्षेचे आयोजन करावे.

**ब.** NSQF अंतर्गत व्यवसाय शिक्षण विषयाच्या X१ ते X४, X६ ते X९, ९५,९७,९८ तसेच NSQF अंतर्गत व्यवसाय शिक्षण विषयाच्या X१,९१,९२,व ९३ विषयांच्या परीक्षा काही शाळांमध्ये व काही शाळातील शासकीय तंत्र विद्यालयमध्ये आयोजित केली जाते या शाळांचे संबंधित विषयांचे गुणपत्रके सोबत देण्यात आली असून ज्या शाळांची परीक्षा शासकीय तंत्र शाळामध्ये आयोजित केली जातात त्यांनी त्यांच्या OMR गुणपत्रिका व उत्तरपत्रिका शासकीय तंत्र शाळेमध्ये जमा करून त्यांच्या मार्फत निर्धारित दिनांकास परीक्षेचे आयोजन करून गुण दिलेल्या OMR गुणपत्रिका व उत्तरपत्रिका आपल्या शाळेमध्ये जमा करून घेवून त्या अनुक्रमानुसार लावून गुणपत्रिका व उत्तरपत्रिका पाकीट सिलबंध करून निर्धारित तारखेस मंडळास जमा करावे.

**प्रात्यक्षिक, तोंडी, प्रकल्प अंतर्गत विषय गुणतक्ते भरण्याबाबतच्या व मंडळाकडे सादर करण्याबाबतच्या सुचना-**

मार्च/एप्रिल २०२२ प्रात्यक्षिक/अंतर्गत/तोंडी (Practical/Internal/Oral) परीक्षेसाठी OMR या पध्दतीचे गुणतक्ते देण्यात येत आहेत. त्या अनुषगाने गुणतक्ते भरताना Scanning योग्यरितीने होण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे देण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

कृ.मा.प.

१. प्राप्त गुण बैठक क्रमांकासमोर (Seat No.) दिलेल्या चौकटीतच सुवाच्च अक्षरात भरावे व त्या अनुषंगाने समोरील OMR चे वर्तुळ काळया/निळ्या (Blue / Black) शाईने भरावे.
२. बारकोडवर काहीही लिहू नये. सही करू नये.
३. सदर OMR शीटला फोल्ड / सही करू नये.
४. गुणपत्रिका (Marklist) भरताना OMR चे वर्तुळ भरलेले आहे व खाली Page Total केलेली आहे याची खातरजमा करून घेण्यात यावी.
५. सर्व विषयांचे गुणतक्ते काळजीपूर्वक भरून ते अनुक्रमांकानुसार मंडळाने पूरविलेल्या पाकीटात सादर करावे.
६. सदर देण्यात येणाऱ्या OMR पद्धतीच्या गुणपत्रिकेमध्ये कोणत्याही प्रकारची खाडाखोड करू नये.
७. माध्यम बदल असल्यास पूर्वीच्याच मुळ OMR गुणपत्रिकेत नमुद बैठक क्रमांकासमोर प्राप्त गुणाची नोंद करावी.
८. गुणपत्रिकेमध्ये आसलेल्या छापील बैठक क्रमांकाची एकूणातील गुणात नोंद घ्यावी. गुणपत्रिकेमध्ये अतिविलंबाने प्रविष्ठ होणारे विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक अथवा विषय बदल घेवून प्रविष्ठ होणाऱ्या बैठक क्रमांकाचे नोंद कारावी तसेच अधिकृत पत्रावर खालील प्रमाणे नोंद करून स्वतंत्ररित्या गुणतक्ते वरील गुणतक्त्यासोबत पाठविण्यात यावेत. तरच अशा विद्यार्थ्यांचे गुण ग्राहय धरले जातील.

| अ.क्र. | विषयाचे नाव | विषय सांकेतिक क्रमांक | बैठक क्रमांक | मिळालेले गुण | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | अंकात | अक्षरात |
| १ | | | | | |

**वरील प्रमाणे गुणतक्ते भरण्याची कार्यवाही करावी.**

९. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कार्यानुभव विषयांच्या लेखी व प्रात्यक्षीक परीक्षा दिनांक ०५/०४/२०२२ ते १६/०४/२०२२ या कलावधीत संबंधित शाळा मुख्याध्यापक यांनी आपल्या स्तरावर प्रचलित कार्यपध्दतीनुसार आयोजित कराव्यात. संबंधित शाळांनी सविस्तर सुचनाबाबत संदर्भ क्रमांक ०२ चे पत्र अवलोकीत करावे.
१०. श्रेणी, तोंडी, पूर्व व्यवसायिक परीक्षा, अंध व अपंगासाठी कार्यानुभव, तंत्र व पूर्व व्यवसायिक प्रात्यक्षिक परीक्षा गुणतक्ते व साहित्याचे वाटप दिनांक १८/०२/२०२२ रोजी करण्यात येईल. सदरचे तोंडी परीक्षेचे साहित्य परीक्षा झाल्यानंतर शाळेने वितरण केंद्रावर दिनांक १५/०३/२०२२ रोजी नचूकता जमा करावे.
११. कोल्हापूर शहर, करवीर, गगणबावडा, पन्हाळा, कागल, शाहूवाडी येथील शाळेच्या प्रमुखांनी सदरचे साहित्य दिनांक १५/०३/२०२२ रोजी नचूकता मंडळ कार्यालयात जमा करावे.

विभागीय सचिवांकरिता,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी,**

**सर्व वितरण केंद्रप्रमुख -**

शाळांकडून जमा झालेले साहित्य वितरण केंद्र प्रमुखांनी शाळानिहाय क्रमनिहाय लावून मंडळ वाहनसोबतच्या मंडळ प्रतिनिधीकडे दिनांक **१७/०३/२०२२** रोजी जमा करावे. सदरचे साहीत्य जमा करण्यासाठी सांगली व सातारा जिल्हातील वितरण केंद्र प्रमुखांनी दिनांक **१९/०३/२०२२** रोजी सकाळी ११.०० वाजता कोल्हापूर विभागीय मंडळ कार्यालयात उपस्थित राहावे. कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज, कासारवाडा व आळते या वितरण केंद्र प्रतिनिधींनी दिनांक **२०/०३/२०२२** रोजी सकाळी ११.०० वाजता कोल्हापूर विभागीय मंडळ कार्यालयात उपस्थित राहावे.

D/SONALISRIRAM/office corr/Paripatrak ssc mar-april 2022